क्रमांक : का.स./बैठक/२०२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ११ जुलै, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १९ जून, २००३ (गुरुवार) रोजी झालेल्या २०२ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
स्कुलनेट इंडिया लिमिटेड,
बीजीएस अँड सन्स बिल्डींग,
१६६, सीएसटी रोड, कालिना, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई - ४०० ०९८.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

महापालिका आयुक्त - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २०२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १९ जून , २००३ (गुरुवार) |
| वेळ | : | सायंकाळी ५.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.हरिशंकरन् | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.विश्वास धुमाळ<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>(अतिरिक्त कार्यभार) | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ
शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग व उर्जा विभाग

श्री.विद्याधर कानडे
अतिरिक्त महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री.जी.एन.वराडे
संचालक,
पर्यावरण विभाग.

डॉ.टी. चंद्रशेखर
प्रकल्प संचालक/सह महानगर आयुक्त

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

**<u>बाब क्र.१</u> : <u>दिनांक २४ एप्रिल, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०१ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२</u> : <u>दिनांक २४ एप्रिल, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मागील (२०१ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील खालील बाब टिप्पणीवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आला :-

<u>बाब क्र.५</u> : <u>मुंबईमध्ये अंधेरी-घाटकोपर मार्गाच्या लगत सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी करीता प्रस्ताव</u>

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, यापूर्वी सल्लागारांनी केलेला सुसाध्यता अभ्यास अद्ययावत करण्यासाठी मेसर्स कन्सल्टंट इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (CES) यांची रु.१६.६५ लाख फी व ८% सेवाकर देऊन सदर कामाकरीता नेमणूक करण्यात आली. कार्यकारी समितीने सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी दिली आहे. श्री.तांबे यांनी नवीन रेल्वे आधारीत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अंमलात आणताना ती सध्याच्या रेल्वे व्यवस्थेशी जोडता येईल का त्याची विचारणा केली. त्यावर असे स्पष्टीकरण देण्यात आले की, नवीन रेल्वे वाहतूकीची Technology वेगळी असल्याने ती सध्याच्या रेल्वेस जोडता येणार नाही. परंतु सध्याच्या रेल्वे स्टेशनवरुन प्रवाशांना नव्या रेल्वेच्या स्थानकावर सुलभतेने जाता येईल याची दक्षता घेतली जाईल. तसेच दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ (DMRC) तर्फे तयार करण्यात येणा-या बृहत योजनेमध्ये (Master Plan) मध्ये सध्याच्या रेल्वे वाहतूक व्यवस्थेशी एकात्मिकता (Connectivity) साधण्याबद्दलही विचार व नियोजन होणार आहे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

**बाब क्र.३ : वडाळा भारवाहक तळ येथील सायन-कोळीवाडा जोडरस्त्याच्या बांधकामाची निविदा मंजूर करणेबाबत. (साखळी क्रमांक २०० मीटर ते ५२५ मीटर)**

३.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विषद करताना वडाळा भारवाहक तळ येथील सायन-कोळीवाडा जोडरस्त्याच्या सुमारे ३०० मीटर लांबीच्या बांधकामासाठी निविदा मागविण्याकरीता इंग्रजी वर्तमानपत्र 'एशियन एज' व मराठी वर्तमानपत्र 'सकाळ' यामध्ये दिनांक २८-३-२००३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाचा अंदाजित खर्च रु.७४,५२,०२६ इतका असून नियोजित निविदेमध्ये कामाचा कालावधी ६ महिने (पावसाळयासहीत) नमूद करण्यात आला आहे. एकूण ७ कोरे निविदा संच विकण्यात आले होते. दिनांक १९.५.२००३ पर्यंत निविदेच्या शेवटच्या तारखेपर्यंत मे. अमर कंस्ट्रक्शन कार्पोरेशनची एकच निविदा ठेकेदाराकडून प्राप्त झाली. सदरहू ठेकेदारानी दरपत्रकाच्या अंदाजित किंमतीपेक्षा १६.०६% कमी इतका दर निविदेमध्ये नमूद केला आहे. महानगर आयुक्तांनी पुढे सांगितले की, सार्वजनिक बांधकाम संहीताप्रमाणे संबंधीत ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या व मे. अमर कंन्स्ट्रक्शन कॅार्पोरेशन या ठेकेदाराने अंदाजित दरपत्रकाच्या किंमतीपेक्षा १६.१०% कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरहू कामासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

३.२ मा.अध्यक्षांनी सदर ठेकेदाराने या अगोदर काम केले आहे का तसेच अंदाजित दरपत्रकापेक्षा १६.१०% कमी भरलेला दर हा योग्य आहे का याची विचारणा केली असता, मुख्य अभियंता यांनी सदर ठेकेदार प्राधिकरणाची कामे करीत आहे तसेच भरलेला दर हा बाजारात सर्वसाधारण मंदी असल्यामुळे व कमी प्रमाणात कामे उपलब्ध असल्यामुळे निविदेमध्ये नमूद केलेला दर योग्य आहे असे सादर केले आहे.

३.३ सदरहू बाब टिप्पणीवर चर्चा होत असताना श्री.तांबे यांनी विचारणा केली की, वडाळा भारवाहक तळ येथे सर्व वाहतूकदारांचे स्थलांतर करावयाचे होते व त्यासाठी एक कायदाही करावयाचा होता. त्या प्रस्तावाचे पुढे काय झाले. वडाळा भारवाहक तळ प्राधिकरण याची कायद्याने स्थापना

करण्यात आलेली आहे असे प्रतिपादन केले. परंतु तेथील गोदामे व कार्यालयांच्या इमारतींचे काम विविध् कारणांनी रखडले असल्याने वाहतूकदारांचे स्थलांतर कायद्याने अनिवार्य करणे कठीण झाले आहे असेही नमूद करण्यात आले. श्री.तांबे यांनी कायदेशीर तरतुदीनुसार वाहतूकदारांचे भारवाहक तळ (Truck Terminal) मधील स्थलांतर अनिवार्य केल्याशिवाय भारवाहक तळाचा उद्‌देश साध्य होणार नाही असे सांगितले. प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वडाळा ट्रक टर्मिनल येथे प्राधिकरणाने (सुमारे) २०० कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. तेथील गाळे विकून फक्त (सुमारे) रु.४० कोटी इतका निधी उपलब्ध झाला आहे. वडाळा भारवाहक तळामधील गाळयावर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आकारण्यात येणारा प्रॉपर्टी टॅक्स तसेच शासनाकडून आकारण्यात येणारे भुईभाडे याचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्राधिकरण राबवित असलेला वडाळा भारवाहक तळ हा प्रकल्प आर्थिकदृष्टया फायदेशीर नाही. या विषयावर तोडगा काढण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन करण्यात यावे अशी विनंती प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी मा. अध्यक्षांना केली. त्यास मा.अध्यक्षांनी मान्यता दिली.

३.४ कार्यकारी समितीने बाब टिप्पणीवर चर्चा करुन पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८७६</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मे.अमर कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन या ठेकेदाराने उपरोक्त कामासाठी लागणा-या ६ महिन्याच्या कालावधीसाठी (पावसाळयासहित) निविदा दराच्या किंमतीतील चढ-उताराच्या अधीन राहून व इतर आकस्मिक खर्चाच्या तरतुदीनुसार, अंदाजित दरपत्रकाच्या रु.७४,५२,०२६/- तुलनेत १६.१०% कमी दराची सादर केलेल्या निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना असे अधिकार देण्यात येत आहे की, कार्यवृत्ताच्या मंजूरीची वाट न बघता उपरोक्त कामासाठी निविदेनुसार लागणा-या कागदपत्रांची पूर्तता करावी."

**वाब क्र.४ : संक्रमण सदनिका, कोकरी आगार, वडाळा येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण व प्रतिक्षानगर येथील नाल्याचे बांधकाम.**

४.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत तात्पूरत्या संक्रमण सदनिकामध्ये सुमारे ३६०० कुटुंबांचे पुनर्वसन कोकरी वडाळा आगार येथे करण्यात आले आहे असे सांगितले. लोकसभा सदस्यांच्या समितीने दिनांक २९ मे, २००३ रोजी वडाळा येथील संक्रमण शिबिरास भेट दिलेल्या पाहणीमध्ये परिसरातील पर्यावरणात सुधारणा करुन तेथे वास्तव्य करण्यात आलेल्या कुटुंबांचे जीवनमान उन्नत करण्यासाठी कोकरी आगार येथील रस्त्यांचे डांबरीकरण करावे. तसेच प्रतिक्षानगर येथील नाला बंदिस्त करावा अशा प्रकारच्या सुचना दिल्या. महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, सदरहू संक्रमण सदनिका वडाळा येथील केंद्र शासनाच्या सार्वजनिक विभागाच्या तात्पुरत्या हस्तांतरीत करण्यात आलेल्या जमिनीवर बांधल्या आहेत. सदरहू संक्रमण सदनिका मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे बाधित होणा-या पात्र कुटुंबांच्या पुनर्वसनासाठीही भविष्यकाळात उपयोगी पडतील. या सर्व बाबींचा विचार करुन बाब टिप्पणीतील प्रस्तावास मंजूरी द्यावी असे निवेदन केले.

४.२ बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.८७७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,** १९७४ च्या कलम ७(३) (ii) व (iii) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्रस्तावित रस्त्याचे डांबरीकरण आणि नाल्याचे बांधकाम करण्यास कार्यकारी समिती मान्यता देत आहे. तसेच त्याकरीता होणा-या रु.६३.७५ लाख खर्चास मंजूरी देत आहे व हा खर्च मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी असलेल्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पातून भागविण्यात यावा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर ठरावाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP)
- मुंबई बेटासाठी सुचविलेल्या उपयोजना.

५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई बेटासाठी तयार करण्यात आलेला मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा अहवाल तयार नसल्यामुळे कार्यकारी समितीच्या मागील बैठकीत सादर करण्यात आला नव्हता. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या संपूर्ण योजनांना प्राधिकरणाने प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता दिली आहे. त्यामुळे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा मुंबई बेटाचा अहवाल कार्यकारी समितीच्या माहितीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यानंतर सल्लागारांनी मुंबई बेटासाठी तयार करण्यात आलेल्या मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अहवालाचे सादरीकरण केले.

५.२ श्री.तांबे, सदस्य यांनी डब्लु.एस.अटकीन सल्लागार यांनी यापूर्वी (१९९२-९४) परिवहन संबंधीचा प्रकल्प अहवाल तयार केला होता. नवीन प्रकल्प अहवाल तयार करताना त्या अहवालाच्या शिफारशींची नोंद घेणे आवश्यक आहे असेही त्यांनी प्रतिपादन केले. प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी परिवहन प्रकल्पासंदर्भात सल्लागारांनी यापूर्वी केलेल्या अहवालांचा विचार करुनच हा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे असे स्पष्ट केले. प्रधान सचिव, उद्योग यांनी प्राधिकरण मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पावर मोठया प्रमाणात निधी खर्च करणार असल्याने हा निधी कसा उभा करण्यात येणार आहे व त्यावर Return कसे मिळणार आहेत याचा विचार होणे आवश्यक आहे असे नमूद केले.

५.३ महानगर आयुक्तांनी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यासाठी लागणारा निधी व प्राधिकरणाची आर्थिक स्थिती याबाबतची माहिती कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येईल असे सांगितले. मा.अध्यक्षांनी उड्डाणपुलाच्या आराखडयासंबंधी अशी सूचना केली की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) आतापर्यंत बांधलेल्या उड्डाणपुलांचा अनुभव लक्षात घेऊन उड्डाणपुलाचा वाहतुकीसाठी जास्तीत जास्त उपयोग होईल अशात-हेने आराखडे तयार करावेत उदाहरणार्थ म्हणून त्यात सायन व लव्ह ग्रोव्ह (Love grove) येथील एकतर्फी उड्डाणपुलाचा उल्लेख केला.

५.४ सविस्तर चर्चेनंतर, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक त्वरीत करावी, आणि प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक आराखडे पावसाळयाचा कालावधी वाया न जाऊ देता तयार करण्यात यावेत असे निदेश दिले.

५.५ मा.अध्यक्षांनी पुढे असेही निदेश दिले की, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या नियोजनाचे वेळापत्रक अशा पध्दतीने तयार करण्यात यावे की, प्रकल्पाचे काम प्रत्यक्षरित्या ऑक्टोबर, २००३ पासून सुरु होऊ शकेल. कामाच्या अपेक्षित प्रगतीचा आलेख (Bar Chart) अंतिम लक्षाचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावा.

५.६ कार्यकारी समितीने मुंबई बेटाच्या योजनेला सहमती दर्शविली.

बाब क्र.६ : सिकॉमकडील प्राधिकरणाची ठेव रु.२४६.१७ कोटी (मार्च, २००३) याबाबतचा अहवाल.

६.१ व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम हे मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस उपस्थित होते. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सांगितले की, सिकॉम या संस्थेने प्राधिकरणाची देय झालेली जानेवारी, फेब्रुवारी व मे, २००३ च्या ठेवीची रक्कम रु.२०१.१८ कोटी प्राधिकरणास देय तारखेस अदा केलेली नाही. प्राधिकरणास निधीची तातडीने आवश्यकता असल्यामुळे प्राधिकरणाने सिकॉमला देय निधी देण्याबाबत विनंती केली होती, सदर निधी प्राधिकरणास देण्यास सिकॉम या संस्थेने असमर्थता दाखविली आहे, सिकॉम या संस्थेचे सन २००२-०३ सालचे वार्षिक लेखे प्राधिकरणास नुकतेच प्राप्त झाले आहेत असेही सांगितले. सिकॉमच्या लेख्यावर प्राधिकरणाचे आयकर सल्लागार मे.एम.एल.भुवानी ॲण्ड कंपनी यांच्याकडून अभिप्राय घेण्यात आले आहेत. सदर सल्लागारांनी सिकॉमचे उत्पन्न व नफा कमी होत आहे, तसेच उत्पन्न व खर्चातील तफावत कमी होत आहे, सिकॉमकडील प्रमाणभूत (कर्ज) मत्ता (Standard (Loan) Assets) कमी होत आहे, नॉन परफॉर्मिंग ॲसेटमध्ये (NPA) वाढ होत आहे, Debt equity ratio जास्त आहे, तसेच सिकॉमने स्विकारलेल्या ठेवी हया अल्प मुदतीच्या असून त्या ठेवीपोटी दीर्घ/मध्यम मुदतीची कर्जे सिकॉमने दिलेली आहेत त्यामुळे सिकॉमला अल्पमुदतीच्या ठेवी परत करणे कठीण होत आहे असा अहवाल दिलेला आहे.

मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे असे सांगितले की, सिकॉमने प्राधिकरणाच्या ठेवी देय तारखेस अदा न केल्यामुळे कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार देय झालेल्या ठेवीवर २% अतिरिक्त व्याज आकारण्यात आले असून सिकॉमकडील ठेवीचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही.

६.२ व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम यांनी असे सांगितले की, सिकॉम या संस्थेची नोंदणी बिगर बँक वित्तीय महामंडळ यामध्ये करण्यात आलेली असल्यामुळे रिझर्व्ह बँकेचे प्रचलित नियम सिकॉमला लागू आहेत. त्याप्रमाणे लेखे तयार करण्यात आले आहेत. निव्वळ एन.पी.ए. गेल्या वर्षापेक्षा कमी झाले आहेत. भांडवली पर्याप्ती प्रमाणामध्ये (Capital adequacy ratio) वाढ झालेली आहे. तसेच एन.पी.ए.चे कर्ज मत्तेशी असलेल्या प्रमाणात घट (NPA to Assets) झालेली आहे. तसेच सिकॉम प्राधिकरणाच्या सल्लागारांनी सिकॉमच्या वार्षिक लेख्यावर दिलेल्या अभिप्रायाशी सहमत नसल्याचे सांगितले. प्राधिकरणाने गेली काही वर्षे सिकॉमकडे निधी ठेवीच्या स्वरुपात ठेवला आहे व ठेवीचे वेळोवेळी नुतनीकरण करण्यात आले आहे. प्राधिकरणाने एकाच वर्षी सर्व ठेवीची मागणी केल्यास सिकॉमला निधी देणे अडचणीचे आहे व सिकॉम हप्त्याहप्त्याने प्राधिकरणाचा निधी व्याजासह परत करील असे प्रतिपादन केले.

६.३ प्राधिकरणाच्या विधी सल्लागार यांनी सिकॉमची नोंदणी बिगर बँक वित्तीय महामंडळ यामध्ये करण्यात आलेली असल्यामुळे सिकॉम प्राधिकरणाकडून ठेवी स्वीकारु शकत नाही. तसेच सिकॉम या संस्थेस प्राधिकरण कर्जही देऊ शकत नाही व दिनांक ६.८.२००२ चा शासन निर्णय हा सार्वजनिक उपक्रमांसाठी असल्यामुळे तो प्राधिकरणास लागू नाही. त्यामुळे सिकॉमकडील प्राधिकरणाने ठेवलेल्या ठेवी सिकॉमने प्राधिकरणास परत कराव्यात असे सांगितले.

६.४ व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १८(२) मधील तरतुदीनुसार शासनाने गुंतवणूकीचे आदेश निर्गमित केले आहेत. शासनाच्या निर्णयानुसार प्राधिकरणाने सिकॉमकडे निधी ठेवला आहे व सिकॉम प्राधिकरणाकडून ठेवीच्या स्वरुपात निधी स्विकारु शकते असे मत त्यांच्या विधी विभागाने दिलेले आहे.

महानगर आयुक्त यांनी सिकॉमचे व्यावसायिक उत्पन्न कमी झालेले आहे. तसेच शासनाच्या कर्जाची परतफेड केली असल्यामुळे सिकॉमला ११५ कोटी रुपयाची सूट मिळालेली आहे. त्यामुळे मागील वर्षी एकूण उत्पन्नात असाधारण वाढ दिसते. पुढील वर्षी सिकॉमची आर्थिक स्थिती कशी असेल याबाबत विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम यांनी असे सादर केले की, सिकॉम या संस्थेने एन.पी.ए.साठी आवश्यक असलेली तरतुद लेख्यामध्ये केलेली असल्यामुळे पुढील वर्षी एन.पी.ए.ची तरतुद लेख्यामध्ये करण्याची आवश्यकता भासणार नाही व सिकॉमला पुढील वर्षी सुमारे रु.२५ कोटी फायदा होईल असे अपेक्षित आहे.

६.५ मा.अध्यक्षांनी सांगितले की, सिकॉममध्ये शासनाने ४९% रक्कम गुंतविलेली आहे व अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची नेमणूकही शासनाकडून करण्यात येते. रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित नियमानुसार सिकॉमला लेख्यामध्ये काही तरतुदी कराव्या लागलेल्या आहेत. त्यामुळे सिकॉमची आर्थिक परिस्थिती ढासळली आहे अशी भिती बाळगणे योग्य होणार नाही. तसेच सिकॉमने मे, २००३ अखेर ठेवीवरील व्याज प्राधिकरणास अदा केलेले आहे. प्राधिकरणाने सिकॉमकडील ठेवीचे या अगोदर वेळोवेळी नुतनीकरण केलेले असल्यामुळे एकाच वर्षी सर्व ठेवी काढू नये असेही सुचविले. मात्र जोपर्यंत सिकॉमकडील ठेवीचे नुतनीकरण करण्यात येत नाही तोपर्यंत २% अतिरिक्त व्याज आकारण्यात यावे.

६.६ सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यावर कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले :-

१) प्राधिकरणास आवश्यक असणारा निधी विचारात घेऊन महानगर आयुक्त ठरवतील त्या कालावधीसाठी गुंतवणूकीच्या दिनांक ६.८.२००२ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून सिकॉमकडील देय ठेवीचे नुतनीकरण करण्यात यावे.

२) सिकॉमकडील ठेवीचे जोपर्यंत नूतनीकरण करण्यात येत नाही तोपर्यत कार्यकारी समितीच्या यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार २% अतिरिक्त व्याज सिकॉमने अदा करावे.

३) व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम यांनी महानगर आयुक्त, प्राधिकरण यांच्याशी चर्चा करुन सिकॉमकडील ठेवी परतीचे वेळापत्रक प्राधिकरणास सादर करावे.

४) शासन निर्णयानुसार प्राधिकरणाची व इतर सार्वजनिक संस्थांची सिकॉमकडील ठेव सुरक्षित राहण्यासाठी सिकॉमने केलेल्या Deed of Charge on loan receivables / securities तसेच Trust Agreement यास कार्यकारी समिती मंजूरी देत आहे. परंतु करारपत्रातील कलम ५.२ व ५.३ मध्ये आवश्यक ते बदल करुन घेण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५) सिकॉमकडील ठेवी सुरक्षित राहण्यासाठी सिकॉमकडे असलेल्या प्रमाणभूत (कर्ज) मत्ता (Standard (Loan) Assets) याबाबतचे प्रमाणपत्र सिकॉमचे कंपनी सचिव किंवा सनदी लेखापाल यांच्याकडून प्रमाणित करुन दर त्रैमासिक प्राधिकरणास सादर करणे आवश्यक आहे.

६) सिकॉमला यापूर्वी देण्यात आलेल्या ठेवी परत मिळाल्याशिवाय सिकॉमला नव्याने पुन्हा ठेवी देण्यात येऊ नये.

७) सिकॉमकडील ठेवींबाबतच्या वरील निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी कार्यकारी समितीने शासकीय उपक्रमांकडील ठेवींबाबत यापूर्वी घेतलेल्या निर्णयात आवश्यक तेथे बदल / शिथिलीकरण करण्यात यावे.

बाब क्र.७ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेचे सह-अध्यक्ष व इतर तीन सदस्यांच्या नामनिर्देशनाबाबत. (म.नि.उ.सं.)

महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष व इतर सदस्य यांचे नव्याने नामनिर्देशन करण्याचे अधिकार कार्यकारी समितीने, शासनाचे मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना प्रदान केले.

बाब क्र.८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल एप्रिल, २००३ ते मे, २००३.

प्राधिकरणाकडील एप्रिल, २००३ ते मे, २००३ पर्यंतच्या असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.९ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी तिमाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ जानेवारी, २००३ ते ३१ मार्च, २००३.**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी दिनांक १ जानेवारी, २००३ ते दिनांक ३१ मार्च, २००३ च्या तिमाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.१० : सि.स.नं.१७५ अ/४ (पार्ट) मौजे मजास येथे प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन सदनिकांचे बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीस मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या बाबीची पार्श्वभूमी विषद करताना महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणामार्फत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार असून त्यासाठी काही प्रमाणावर पुनर्वसन करण्याची गरज भासणार आहे. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून हस्तांतरित करण्यात आलेल्या पुनमनगर येथील भूखंडावर पक्क्या सदनिकांचे बांधकाम करण्याची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीमध्ये सादर केली होती व त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

१०.२ या कामावरील गुणवत्ता ठेवणे, कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे आदीसाठी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने जागतिक बँकेने पूर्वसूचित मान्य केलेल्या १२ सल्लागारांकडून तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्यात आले होते व त्यातील मे.माहिमतुरा कन्सल्टंट्स यांचा सुमारे रु.३२,३५,१४०/- खर्चाचा प्रस्ताव सर्वात लघुतम आहे.

१०.३ या प्रकल्प बांधकामास लवकर सुरुवात होत असल्यामुळे प्रकल्प सल्लागारांची नियुक्ती प्राथम्याने करण्याची गरज आहे.

१०.४ कामाची निकड लक्षात घेऊन या बाबीस कार्यकारी समितीने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८७८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे पोटकलम (३) (iii) कलम ६ आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या मौजे मजास येथील पुनमनगर या भूखंडावर बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी सदनिकांकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.माहिमतुरा कन्सल्टंट्स प्रा.लि. यांची रु.३२,३५,१४०/- ची प्रथम न्युनतम निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांना सल्लागाराच्या नेमणूकीसंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.११ : वडाळा भारवाहक तळ टप्पा-२ ते सायन कोळीवाडा जोडरस्ता यांना जोडणा-या नगर विकास आराखडयातील रस्त्यांचे बांधकाम.

११.१ या बाबीची पार्श्वभूमी विषद करताना महानगर आयुक्तांनी असे सादर केले की, सदर कामाची निविदा सार्वजनिकरीत्या सन १९९९ मध्ये मागविण्यात आली होती व त्यास प्रतिसाद म्हणून भरलेली मे.रिलायन्स कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा लघुतम होती. वाटाघाटीनंतर त्यांनी त्यांचा देकार अंदाजित रकमेपेक्षा १०.८९% जास्त होता. या निविदेस कार्यकारी समितीने दिनांक ७.३.२००० रोजी झालेल्या १८४ व्या बैठकीत ठराव क्र.७८६ अन्वये मंजूरी दिली होती. तथापि, कार्यकारी समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरुन महानगर आयुक्त यांनी बांधकामाच्या जागेस दिनांक ६.५.२००० रोजी प्रत्यक्ष भेट दिली व असे आदेश दिले की, सायन-कोळीवाडा जोडरस्त्याचे बांधकाम व संदर्भित रस्त्याचे बांधकाम हे एकदमच सुरु करावे. तथापि, सायन-कोळीवाडा रस्त्यामध्ये असलेल्या झोपडया

(Missing Link of Road) या आधी हटविणे शक्य न झाल्यामुळे त्या रस्त्याचे व प्रस्तावित रस्त्याचे बांधकाम हाती घेणेही शक्य झाले नाही. सायन-कोळीवाडा रस्त्यावरील झोपडया आता हटविण्यात आल्या असून सदर जागा बांधकामास उपलब्ध झाली आहे. तसेच त्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा हया अंदाजित रकमेच्या निविदेपेक्षा १६.१०% ने कमी आहे.

११.२ या बाबी संदर्भात पुरक माहिती देताना प्रकल्प संचालक व सह-महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, सायन-कोळीवाडा रस्त्यावरील झोपडया नुकत्याच हटविण्यात आलेल्या आहेत. रस्त्याचे काम हाती न घेतल्यास या जागेत पुन्हा झोपडया येण्याची शक्यता आहे. तथापि दोन्ही कामे प्राथम्याने हाती घेणे आवश्यक आहे. या कामास सन २००१-०२ च्या सार्वजनिक बांधकामाचे दर सूचीप्रमाणे अंदाजित खर्च रु.१,८८,६७,६५३/- अपेक्षित आहे. परंतु ठेकेदाराशी वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी अंदाजित येणा-या खर्चामध्ये १६.१०% कमी करण्यास अनुमती दर्शविली आहे. त्यामुळे अपेक्षित खर्चाची रक्कम कार्यकारी समितीने पूर्वी मंजुर केलेल्या खर्चाच्या रकमेच्या तुलनेत ११.८७% पेक्षा कमी आहे.

११.३ वरील बाबी विचारात घेऊन व आता दोन्ही रस्त्यांचे बांधकाम एकदम सुरु करणे शक्य आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत दरात झालेला बदल विचारात घेऊन मे.रिलायन्स कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या व कार्यकारी समितीने सदर कामासाठी पूर्वी रु.१,७९,६२,०६४/- च्या लघुतम निविदेस मंजूरी दिली होती. ठेकेदाराबरोबर वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी पूर्वी कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या निविदा रु.२१,३२,१०३/- ने कमी करण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सदर कामावरील सुधारीत खर्च रु.१,५८,२९,१६१/- इतका अपेक्षित आहे.

११.४ वरील बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीने बाब टिप्पणीस मान्यता देऊन पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८७९</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदारास उपरोक्त कामासाठी निविदा दराच्या

किंमतीतील चढ-उताराच्या अधीन राहून व इतर आकस्मिक खर्चाच्या तरतूदीनुसार कार्यकारी समितीच्या १८४ व्या बैठकीत ठराव क्र.७८६ नुसार मंजूर केलेल्या निविदेची किंमत रु.१,७९,६२,०६४/- च्या तुलनेत ११.८७% कमी दराने म्हणजे रु.१,५८,२९,९६१/-किंमतीच्या सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना असे अधिकार देण्यात येत आहेत की, कार्यवृत्ताच्या मंजूरीची वाट न बघता उपरोक्त कामासाठी निविदेनुसार लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करावी."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooo ———